वाघ शिक्षण संस्थेत इको फ्रेंडली कार्यशाळा

साडेतीन हजार विद्यार्थ्यांनी साकारला 'बाप्पा'

नाशिक : प्रतिनिधी

के. के. वाघ शिक्षण संस्था नाशिक आणि स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्स्चेंज (स्माईल) व स्पिनॅच सेंटर ऑफ एक्सलन्स यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात शाडूमातीपासून गणेशमूर्ती म्हणून इको फ्रेंडली गणेशा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी जिल्ह्यातील विविध शाळांच्या ३५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी हजेरी लावत गणपती बाप्पाची मूर्ती साकारल्या. यापैकी बहुतांश विद्यार्थी हे त्यांनी साकारलेले शाडू मातीच्या बाप्पाची प्राणप्रतिष्ठापना करणार आहेत.

कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता प्रशांत पगार, श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्टच्या विश्वस्त मनज्योत पाटील, आडगाव पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन खैरनार, म्हसरूळ पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल डहाके, माजी नगरसेवक उद्धव निमसे, माजी नगरसेवक सुरेश खेताडे, माजी नगरसेवक रुची कुंभारकर उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेच्या विश्वस्त शकुंतलाताई वाघ, संस्थेचे जनसंपर्क सचिव व स्माईल व स्पिनॅच संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ, प्राचार्य डॉ. के.एन. नांदुरकर, प्राचार्य पी. टी. कडवे, बाळ नगरकर, प्राचार्य सचिन जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

इको फ्रेंडली गणेशा कार्यशाळेस शहरी भागासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात कार्यशाळेत सहभाग घेत, शाडू माती पासून सुबक, सुरेख व देखण्या गणेशमूर्ती साकारलेल्या मूर्ती बघून संस्कृती, संस्कार साध्य होताना पाहून मनस्वी आनंद होत असल्याचे प्रतिपादन नाशिक महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता प्रशांत पगार यांनी केले. शकुंतलाताई वाघ, अजिंक्य वाघ यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. विलास पाटील यांनी केले. कार्यशाळा यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांचे मार्गदर्शन लाभले.